# 6. मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास

**प्रश्न १ ला. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात मनोरंजन का आवश्यक असते.

२) चित्रपट पहाणे हे अकृतिशील मनोरंजन आहे.

३) कागदाच्या होड्या बनवणे हे कृतिशील मनोरंजन आहे.

४) कठपुतळ्यांचा खेळ प्राचीन आहे.

५) संत नामदेवांना महाराष्ट्राचे आद्य कीर्तनकार मानतात.

६) संत एकनाथांची भारुडे लोकप्रिय आहेत.

७) विष्णुदास भावे मराठी रंगभूमीचे जनक आहेत.

८) महाराष्ट्रात संगीत रंगभूमीचा उद्य झाला.

९) देवलांचे संगीत शारदा हे नाटक महत्त्वाचे ठरले.

१०) मराठी रंगभूमी समृध्द आहे.

११) भारतातील चित्रपटांची जननी अशी महाराष्ट्राची ख्याती आहे.

१२) पोवाडे गाताना-ऐकताना वीरश्री संचारते.

**प्रश्न २ रा. थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) मनोरंजन कोणते काम करते ?

२) प्राचीन मध्ययुगीन काळात मनोरंजनाची कोणती साधने होती ?

३) आधुनिक काळातील मनोरंजनाची साधने सांगा.

४) मनोरंजनाचे दोन प्रकारे होणारे वर्गीकरण सांगा.

५) कृतिशील व अकृतिशील मनोरंजन म्हणजे काय ते सांगा.

६) कठपुतळ्यांचा खेळ हा किती प्राचीन आहे ?

७) प्राचीन भारतात कठपुतळ्यांच्या बाहुल्या तयार करण्यासाठी कोणत्या गोष्टी वापरतात ?

८) कठपुतलीचा प्रयोग करण्यासाठी कोण-कोणत्या गोष्टी आवश्यक असतात ?

९) कठपुतळीचे कोणते प्रकार आहेत ?

१०) दशावतारी नाटके कोणत्या दहा अवतारांवर आधारित असतात ?

११) दशावतारी नाटकाच्या शेवटाचे वैशिष्टे कोणते ?

१२) भजन म्हणजे काय? भजनाचे प्रकार कोणते आहेत?

१३) कोणाकोणाची भजने प्रसिद्ध आहेत?

१४) कीर्तनकारांच्या अंगी कोण-कोणते गुण असावे लागातत?

१५) लळित सादर करताना कोण-कोणत्या कथा सांगितल्या जातात?

१६) भारुड कशाला म्हणतात?

१७) संत एकनाथांनी लिहिलेल्या एका भारुडाच्या दोन ओळी लिहा.

१८) तमाशा या पर्शियन शब्दाचा अर्थ काय ? तमाश्याचे दोन प्रकार कोणते?

१९) रंगभूमीशी कोण-कोणते घटक संबंधित असतात?

२०) विष्णुदास भावे मराठी रंगभूमीचे जनक म्हणून का ओळखले जातात?

२१) मराठी रंगभूमी समृध्द व्हायला कोणती कारणे घडली?

२२) चित्रपटनिर्मितीच्या क्षेत्रात कोण-कोणत्या कंपन्यांनी भाग घेतला?

२३) चित्रपटाचे प्रकार सांगा.